# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

---

**दिनांक १९.०७.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १८.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १३ केसेसमध्ये २० ईसमांवर कारवाई करून ३३,४१,२३१/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,३०५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,८२,८५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक १८.०७.२०२६ चे १६.०५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, न्यु ओम साईनगर, प्लॉट क्र. १२५/जी चे बाजुला मोकळया जागेत पांढरे रंगाची किया कंपनीची सेल्टॉस कार क्र. एमएच ४९ बीबी ८८४४ यामध्ये संशयीत इसम असून, त्यांचेजवळ अंमली पदार्थ गांजा आहे. अशा खात्रीशिर माहीती वरून नमुद ठिकाणी पंचासमक्ष गेले असता, तेथे नमुद कार दिसल्याने घेराव टाकून त्यातील इसम पळण्याचे प्रयत्नात असतांना, त्यांना ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांचे नांव पत्ते विचारले असता, गाडीचालकाने त्याने नांव १) सुरज उर्फ सुर्यवंशी प्रकाश उईके वय ३० वर्षे, रा. प्लॉट क्र. ७६, हिंगणा रोड, गेडाम ले आऊट, वानाडोंगरी, एमआयडीसी, नागपुर २) अब्दुल साहील अब्दुल शफीक वय २६ वर्ष रा. न्यु ओम साई नगर, प्लॉट क्र. १२५/जी, कळमणा, नागपूर व ०१ विधीसंघर्षग्रस्त बालक असे सांगीतले. त्यांची तसेच कारची झडती घेतली असता, कारचे मागिल डिक्कीमध्ये ०४ बोरीमध्ये अंमली पदार्थ हिरव्या रंगाचे पानेफुले असलेला, उग्रवास असलेला गांजा एकुण ४२ किलो १५० ग्रॅम वजनाचा मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन गांजा कि. १०,५३,७५०/— रु. चा, ०३ मोबाईल फोन व कार असा एकुण २५,८८,७५०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीची सखोल विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद वाहन जगन्नाथपुरी यात्रेला जाण्याकरीता गाडीमालक याचेकडून किरायाने घेतल्याचे सांगितले. तसेच ते तिघे त्यांचा मित्र अक्षय सुर्यवंशी रा. नंदनवन तसेच निलेश अशोक डोरसे रा. नंदनवन, नागपूर व ओरीसा येथे राहणारा अक्षय नावाचा मित्र यांचेसह ओरीसा येथे गेले होते व तेथे अंगुन—कलकत्ता हायवे रोड, रेडापुल गावाजवळ अक्षय याने गांजा दिल्याचे सांगितले. अक्षय सुर्यवंशी हा रेल्वेने निघाल्याचे तसेच अक्षय नावाचा ईसम रा. ओडीसा हा तेथेच थांबला व इतर सर्व कारने नागपूरला परत आले. निलेश डोरसे याने काही गांजा केडीके कॉलेज जवळील स्मॉर्ट पब्लीक

टॉयलेट येथे उतरविल्याचे सांगितले. उर्वरित गांजा सादीक नावाचे इसमास देण्याकरीता घटनास्थळी थांबल्याचे सांगितले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगुन समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii)(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कळमणा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपीं व विधीसंघर्षग्रस्त बालक यांना मुद्देमालासह कळमणा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, सपोनि. शिवाजी ननवरे, पोहवा किशोर ठाकरे, लक्ष्मण चवरे, नापोअं. शेषराव राऊत, पोअं. अश्वीन मांगे, समीर शेख, कुणाल मसराम, नितीन वासने, मपोहवा आरती चव्हाण, मपोअ पुनम शेंडे व चापोअं. कमलेश क्षीरसागर यांनी केली.



**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगिरी:— एनडीपीएसचे गुन्हयातील पाहिजे आरोपीस अटक</u>.**

दिनांक २५.०६.२०२६ चे १८.५५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे तहसील हद्यीत ईदगाहचे मागील परिसरात, रेल्वे क्वॉर्टरचे समोर, मोहम्मद सुफीयान वल्द मोहम्मद नासीर वय २५ वर्षे रा. गरीब नवाज मस्जिद जवळ, बोरीयापुरा, तहसील, नागपूर याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात पॅन्टचे खिशात झिपलॉक पन्नीत एकुण १२.२५ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आल्याने एम.डी. पावडर, किं. १,२३,४००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. पोलीस ठाणे तहसील येथे आरोपीविरुध्द कलम ८(क),२१(ब) एन.डी.पी.एस. ॲक्ट अन्वये पोलीस ठाणे तहसील येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला होता.

दिनांक १८.०७.२०२६ रोजी गुन्हेशाखा युनिट क्र. ६ चे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन वर नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपी यास टेका नाका, जरीपटका परिसरात सापळा रचून ताब्यात घेतले. त्यास नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद फैजान अंसारी वल्द वकील अंसारी वय ४२ वर्ष रा. कब्रस्तान रोड, मोमीनपुरा, नागपूर असे सांगितले. गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, आरोपीने वर नमुद गुन्हा संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपीस ताब्यात घेऊन पुढील कार्यवाहीस्तव तहसील पोलीसांचे स्वाधीन करण्यात आलेले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कऱ्हाडे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.




**<u>४) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पोलीसांची कामगिरीः— वाहनचोरीचा गुन्हा उघडकीस</u>.**

दिनांक १७.०७.२०२६ चे १९.०० वा. ते १९.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत मातामंदीर जवळ, भांडेवाडी वस्ती, नागपूर येथे फिर्यादी बंटी प्रभाकर मेश्राम वय ३० वर्षे रा. सुरज नगर, वाठोडा ले आऊट, नागपूर यांनी त्यांची होन्डा ॲक्टिवा गाडी क्र. एमएच ४९ बीडी १४६५ किंमती ६०,०००/—रू. ची ही लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे भांडेवाडी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ०२ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून आरोपी नामे हर्षल उर्फ हषु मुकेश तभाने वय १९ वर्षे, रा. बिल्डींग क्र. ४९, क्वॉर्टर क्र. ५८४, एलआयजी हुडको कॉलनी, जरीपटका, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन चोरी केलेले वाहन किंमती ६०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी भांडेवाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमता शुभांगी देशमुख, सपोनि गजानन चांभारे, सफौ राजेश तिवारी, पोहवा महेंद्र सडमाके, अर्जुन यादव, संदीप पांडे, कमलेश गहलोत व विवेक श्रीपाद यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वरः— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १७.०७.२०२६ चे २१.०० वा. ते दिनांक १८.०७.२०२६ चे ०४.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत प्लॉट क्र. ४३, इंद्रनगर, न्यु नरसाळा रोड, नागपूर येथे राहणारे फिर्यादी दिपक भाऊराव बानाईत वय ५६ वर्ष हे रात्री आपले राहते घरात बेडरुममध्ये परिवारासह झोपलेले असतांना, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मागील दुसऱ्या बेडरुमचे दाराजवळील खिडकीतुन आत हात टाकून, दाराची कडी उघडून, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखडी आलमारीतील रोख १,३०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,७९,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे सपोनि संदीप बोरकर यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सिताबर्डी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १७.०७.२०२६ चे २३.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील नामे जटाशंकर लोकई वय ५९ वर्ष रा. वसंतराव नाईक झोपडपट्टी, सिताबर्डी, नागपूर हे त्यांचे सायकलने पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, विदर्भ हॉकी ग्राऊंड गेट समोर, पत्रकार सहनिवास चौक, नागपुर येथुन घरी जात असता, दुचाकी क्र. एमएच ३५ क्यु ५१४१ चा चालक नामे प्रदीप कुंडलिक बोपचे रा. एलआयजी क्वॉर्टर, आदर्श म्हॉडा कॉलनी, खडगाव रोड, वाडी, नागपूर याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन सायकलने जाणारे फिर्यादीचे वडीलांना धडक देवुन गंभीर जखमी केले. लोकांनी जखमी यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी सौ. रेखा सुरज यादव वय २५ वर्ष रा. जौनपुर, उत्तरप्रदेश यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि अमोल नागरिक ९६०४५८०२०८ यांनी दुचाकी वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे वाठोडा** :— पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, जयमाता प्रायमरी शाळेजवळ एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५५ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना पोलीस ठाणे वाठोडा येथील होमगार्ड यांनी दिनांक २९.०५.२०२६ चे १४.३० वा. उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक १८.०७.२०२६ रोजी ०४.३० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. प्रकाश मौर्या यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी/साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्रं. ०६, नागपुर. | ३०४२५७ /२००६ | कलम ५०६(ब),३४ भा.दं.वि. | १)मोहम्मद अकील मोहम्मद इकराम वय २३ वर्ष रा. मोमीनपुरा, हफीज बेकरीचे मागे, पोलीस ठाणे तहसील, नागपुर २)रियाज अहमद मोहम्मद नुमान वय ३८ वर्ष रा. अन्सारनगर, हनीफ पटेलचे बाजुला, मोमीनपुरा, पोलीस ठाणे तहसील, ३)राजा खान रशीद खान वय २१ वर्ष रा. अवस्थीनगर, टिचर कॉलनी, मस्जिदजवळ, पोलीस ठाणे गिट्टीखदान, नागपूर | २१.०७.२०२६ |
| २ | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्रं. ०६, नागपुर. | ३०३४४३ /२००६ | कलम २४ जे.जे. ॲक्ट | सौ. शांताबाई सखाराम धुर्वे वय ४० वर्ष रा. मुंडरई पोस्टे कानीफाडा जि. शिवनी, मध्यप्रदेश, ह.मु. कोराडी देवी मंदीर परिसर, फुटपाथवर पोलीस ठाणे कोराडी, नागपूर. | २१.०७.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**